# महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
# 'ए', रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२०.

दूरध्वनी क्र .०२२-२२०४१७०७

Website - www.glcmumbai.com Email - principal@glcmumbai.com


**शाविम/परीक्षा/२०२६-२७/8459** **दिनांक-१९/१०/२०२६**

## सूचना

**विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक **समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक २५ सप्टेंबर २०२६** अन्वये, सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, शासकीय विधी महाविद्यालयातील **शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या नियमित विद्यार्थ्यांपैकी संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी** परीक्षा शुल्क माफीच्या लाभासाठी खालील Google Form मध्ये आवश्यक माहिती भरून संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

**Google Form लिंक : https://forms.gle/5Lyg45W8pDbzuJEP7**

**आवश्यक सूचना व अटी :**

१. विद्यार्थ्याचे गाव व तालुका शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने शासकीय विधी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये प्रवेश घेतलेला असावा.

३. विद्यार्थ्याने दुष्काळग्रस्त गाव व तालुक्याचा पुरावा म्हणून वैध रहिवासी प्रमाणपत्र/आधार कार्ड सादर करणे आवश्यक आहे.

४. रहिवासी प्रमाणपत्र/आधार कार्ड Google Form मध्ये अपलोड करावीत.

५. परीक्षा शुल्क माफीचा लाभ शासन निर्णयातील तरतुदी, पात्रतेची पडताळणी आणि संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील सूचनांनुसार देण्यात येईल.

७. Google Form भरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २६ ऑक्टोबर २०२६ आहे.

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा.

सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी वरील सूचनांची नोंद घेऊन विहित मुदतीत आवश्यक कार्यवाही करावी.

**Sd/-**
डॉ. अस्मिता वैद्य
प्राचार्य